नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १७/०३/२०२५ (सोमवार)**

---

## चोरीचा गुन्हा उघड, ४ आरोपीतांना अटक, ४० हजार रूपयांचा संपुर्ण मुद्देमाल जप्त नरखेड पोलीसांची कारवाई

पोलीस स्टेशन नरखेड :— अंतर्गत फिर्यादी नामे हरीदास शंकरराव ठाकर, वय—३५ वर्षे रा. नरखेड, तह—नरखेड यांनी पोलीस स्टेशन ला तक्रार दिली की ते एम.एस.ई.बी. कार्यालय नरखेड येथे वरिष्ठ तंत्रज्ञ पदावर असुन यांचे कार्यक्षेत्रात पिपंळगाव वखाजी डॅम्प येथे दिनांक ०९/०३/२०२५ चे ११/०० वा. ते ११/०३/२०२५ रोजी चे १०/०० वा. दरम्याण ०२ ईलेक्ट्रीक पोलवरील २०० फुट अॅल्युमिनियम तार किंमती ४०,०००/—रुपये कुणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला आहे. अश्या फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. ला अप क्र. १९०/२५ कलम ३०३(२) भा.न्या.सं अन्वये गुन्हा दाखल आहे.

नमुद दाखल गुन्हयाचा तपास नरखेड पोलीस करीत असतांना गोपनीय माहितीच्या आधारे सदर गुन्ह्यातील मुद्देमाल आरोपी **क्र. १) सुनिल दिलीप मालोकार, वय ३५ वर्षे २) विजय शंकर भुत, वय ३३ वर्षे ३) रामेशवर दौलत ठोंबरे, वय ३९ वर्षे ४) मंगेश सुखदेवराव भुते, वय २५ वर्षे सर्वे रा, वार्ड क्र, ०२, सावरगाव** यांनी संगनमत करुन चोरी केल्याची माहीती तपासा दरम्याण प्राप्त झाली. नमुद आरोपीतांचा नरखेड पोलीसांची शोध घेवुन त्यांना दिनांक १७/०३/२०२५ रोजी अटक करून आरोपीतांकडुन चोरीस गेलेला संपुर्ण मुद्देमाल २०० फूट अॅल्युमिनियम तार किंमती ४०,०००/—रुपये असा मुद्देमाल जप्त केले आहे.

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ९ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द खालील प्रमाणे गुन्हे नोंद करण्याता आले आहे.

**पोलीस स्टेशन अरोली** अंतर्गत दिनांक १५/०३/२०२५ रोजी पोलीस पेट्रोलीग करीत असतांना त्यांना आरोपी अर्जुन मघुकर मडावी, वयः—२४ वर्षे, रा तुमसर जि भंडारा, हा मौजा चांखाळा, ता. अरोली येथे ,आरोपी नामे २. अक्षय महावीर डेकाटे, वयः—१९ वर्ष, रा अरोली **हा** स्मशान घाट, अरोली येथे, ३.आरोपी नामे राहुल लालचंद खडसे, वय २२ वर्षे, रा अरोली हा अरोली येथे नदीचा पारीवर, आरोपी नामे ४. नंदकिशोर शामराव गैहरवार, वयः—३५ वर्षे, रा घिवारी बोरी,ता. मौदा हा घिवारी बोरी ता. मौदा येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले, नमुद **४ आरोपीतांवर** कलम २७ गुंगीकार औषधीदव्य आणि मनोवयापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत** पोलीस पेट्रोलीग करीत असतांना पोलीसांना आरोपी नामे १. योगेद्र शिवरामजी कामडी, वय ३७ वर्षे, रा.नरखेड हा मौजा उदासिन महाराज मंठ नरखेड येथे, आरोपी क्र.२. नारायण संतोष ढोके, वय ६३ वर्षे, रा.पिठोरी, ता. नरखेड हा आठवडी बाजार नरखेड येथे, ३. सिध्दार्थ कचरुजी बागडे, वय ६२ वर्षे, रा. वार्ड क्र १३ नरखेड, हा रेल्वे उडानपुल नरखेड येथे , ४. विधीसंघर्ष ग्रस्त बालक हा मौजा कामठी टोला तह. नरखेड येथे ,५. क्षितीज दिलीप अखर्ते , वय २० वर्षे, रा.विार्ड क्र १० नरखेड हा मौजा कामठी टोला तह नरखेड येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने **नमुद ५** आरोपीतांवर कलम २७ गुंगीकार औषधीदव्य आणि मनोवयापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर